Maharashtra Times, Tuesday, 1st March, 2011

## प्रगती मंत्र

कोणत्याही क्षेत्रात काम करताना त्या क्षेत्रात आपली कामगिरी उत्कृष्ट व्हावी, यासाठी प्रत्येकाचाच प्रयत्न असतो. हीच उत्कृष्ट कामगिरी समाजात आपले स्थान उंचावण्यासाठी मदत करत असते. त्यामुळे 'उत्कृष्टता' हाच यशस्वी जीवनाचा मार्ग ठरतो. विज्ञानाचा दैनंदिन जीवनातील उपयोग लक्षात घेत सर्व

# काम उत्कृष्टच हवे



प्रगत देशांमध्ये विज्ञानाच्या क्षेत्रातील उत्तमोत्तम संशोधनांसाठी प्रयत्न केले जातात. त्याच बळावर त्यांनी प्रत्येक क्षेत्रात उत्कृष्टता साधली आहे. त्यामुळे सर्वच प्रगत देशांमध्ये 'विज्ञान सर्वत्र पुज्यते' या उक्तीची प्रचीती येते; परंतु अद्याप आपल्याकडे ही बाब तितकीशी लागू पडत नाही. त्यासाठी जास्त मेहनत घेण्याची आपली तयारी नसते. पण कोणत्याच क्षेत्रात बेस्ट ठरणे सोपे नसते, ही बाब आपण विसरतो. जिद्द, सचोटी, प्रयत्नांची पराकाष्ठा आणि आपल्या कामाबद्दलची निष्ठा या पायऱ्यांवरुन हा उत्कृष्टतेचा मार्ग जात असतो. त्या मार्गावर चालण्यासाठी आणि यशस्वी झाल्यानंतर ती उत्कृष्टता पुन्हा इतरांपर्यंत पोचविण्यासाठी आवश्यक ती शिस्त आणि कणखरपणाही अंगी बाणवावा लागतो. याच बळावर अनेक महान व्यक्तींनी त्यांची समाजोपयोगी कार्ये यशस्वीपणे पूर्ण केली आहेत. स्वतःची आणि समाजाचीही प्रगती साधली आहे. नीरक्षीर वृत्ती आपल्या स्वभावात असावी लागते. त्यामुळे उत्कृष्टतेचा मार्ग सोपा नाही हे जरी सत्य असले तरी तो सोडू नका. त्याचप्रमाणे उत्कृष्टतेच्या मार्गावर जाणाऱ्यांना मागे खेचण्याऐवजी त्यांना प्रोत्साहनच द्या.

**-डॉ. जयंत नारळीकर,**

(टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पदवीदान समारंभात केलेले भाषण)